मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# शहरातील हवेच्या गुणवत्तेत झाली सुधारणा

## बांधकामे पुन्हा सुरू करण्यास पालिकेने दिली परवानगी

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** हवेतील गुणवत्तेची पातळी गंभीर असल्याने महापालिका क्षेत्रातील बांधकाम व प्रक्रियेवर निर्बंध लागू करून १९ नोव्हेंबर पर्यत कामे थांबविणेबाबत आदेश निर्गमित झालेले होते. तथापि १३ नोव्हेंबर रोजी प्रकाशित केलेल्या आदेशानुसार मुख्य हॉटस्पॉट आणि जंक्शनवर पाणी शिंपडणे आणि फॉगिंग उपक्रम तीव्र करून एअर क्वालिटी इंडेक्स कमी करण्यासाठी परिश्रमपूर्वक उपाययोजना केल्या आहेत, त्यामुळे गेल्या तीन दिवसांत पातळीसह सुधारणा झाली आहे, मागील गंभीर पातळीपेक्षा लक्षणीय घट झाली आहे. हे लक्षात घेऊन आणि ग्रेडेड रिस्पॉन्स ॲक्शन प्लॅनचे पालन करून, बांधकाम व प्रक्रियेवरील बंदी याद्वारे मागे घेण्यात आली असल्याचे आदेश आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी आज निर्गमित केले आहेत. त्यानुसार नागरी मर्यादित काम पुन्हा सुरू होऊ शकते. तथापि, बांधकाम कंपन्यांना हवेच्या गुणवत्तेच्या पातळीबाबत



जागरुक राहण्याचे निर्देशही याद्वारे देण्यात आले आहेत आणि ए क्यु आय पातळीमध्ये कोणतीही बिघाड टाळण्यासाठी योग्य उपायांची अंमलबजावणी सुरू ठेवली पाहिजे. पर्यावरण विभागाने नियुक्त केलेल्या भागात पाणी शिंपडणे आणि फॉगिंग उपाय सुरू ठेवणे आवश्यक असून अनुपालन सुनिश्चित करण्यासाठी, कोणत्याही उल्लंघनासाठी महापालिकेची पथके त्यांच्या संबंधित प्रभागांवर सतत देखरेख ठेवतील अशी माहिती आयुक्त शेखर सिंह यांनी दिली आहे.

### परिश्रमपूर्वक उपाययोजना केल्या

**» तथापि १३ नोव्हेंबर रोजी प्रकाशित केलेल्या आदेशानुसार मुख्य हॉटस्पॉट आणि जंक्शनवर पाणी शिंपडणे आणि फॉगिंग उपक्रम तीव्र करून एअर क्वालिटी इंडेक्स कमी करण्यासाठी परिश्रमपूर्वक उपाययोजना केल्या आहेत, त्यामुळे गेल्या तीन दिवसांत पातळीसह सुधारणा झाली आहे, मागील गंभीर पातळीपेक्षा लक्षणीय घट झाली आहे. हे लक्षात घेऊन आणि ग्रेडेड रिस्पॉन्स ॲक्शन प्लॅनचे पालन करून, बांधकाम व प्रक्रियेवरील बंदी याद्वारे मागे घेण्यात आली असल्याचे आदेश आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी आज निर्गमित केले आहेत.**

# नेपाळमधील बिरेंद्रनगर नगरपालिकेच्या शिष्टमंडळाची पिंपरी महापालिकेस भेट

## महापालिका कामकाजाच्या बाबतीत अव्वल दर्जा प्राप्त करेल : भंडारी

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा व्यापक विस्तार, केलेली व करण्यात येत असलेली विकासकामे आणि लोकभिमुख दृष्टीकोन पाहून आमचा आत्मविश्वास वाढला असून भविष्यात ही महापालिका कामकाजाच्या बाबतीत अव्वल दर्जा प्राप्त करेल याची खात्री असल्याचे मत नेपाळमधील बिरेंद्रनगर नगरपालिकेच्या नगराध्यक्षा मोहनमाया भंडारी यांनी व्यक्त केले.

नेपाळ येथील शिष्टमंडळाने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीस भेट दिली.आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी त्यांचे स्वागत केले आणि विकास कामांबाबत शिष्टमंडळास माहिती दिली.



त्यावेळी आयुक्तांशी चर्चा करताना त्या बोलत होत्या. शिष्टमंडळाचे स्वागत करताना महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, उल्हास जगताप, कार्यकारी अभियंता बापूसाहेब गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, वास्तू विशारद आणि शहरी प्रकल्प सल्लागार तथा बायसिकेल मेयर आशिक जैन, आय. टी. डी.पी चे उप व्यवस्थापक प्रांजल कुलकर्णी उपस्थित होते. या शिष्टमंडळात नेपाळचे माजी पर्यटन मंत्री यमलाल कांडेल, बिरेंद्रनगर नगरपालिकेच्या उपनगराध्यक्ष निळकंठ खनाल, प्रशासकीय विभाग प्रमुख प्रकाश टंक, प्रकल्प व्यवस्थापक प्रतिष्ठा कांडेल, प्रकल्प अधिकारी अलिशा कारकी यांचा समावेश होता. आयुक्त शेखर सिंह यांनी शिष्टमंडळास माहिती देताना महापालिका राबवत असलेले प्रकल्प, शहरातील वाहतूक, पार्किंग व्यवस्था, शहरातील पादचारी व सायकल मार्ग याचे नियोजन, पाणीपुरवठा आणि जलनिसारण आदींबाबत नागरिकांचा सहभाग घेऊन करीत असलेल्या उपयायोजनां विषयी सविस्तर माहिती दिली.

# पिंपरी-चिंचवडमधील बांधकामे होणार बंद!

## शहरातील सर्व बांधकामे १९ नोव्हेंबरपर्यंत बंद ठेवण्याचे आदेश

**पिंपरी । न्यूज एक्सप्रेस मराठी।** फटाके, वाहनांचा धूर, बांधकामांमुळे शहरातील हवेची पातळी धोकायदाक झाली आहे. त्यामुळे शहरातील सर्व बांधकामे १९ नोव्हेंबरपर्यंत बंद ठेवण्याचे आदेश पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखरसिंह यांनी दिले आहेत. हवेच्या गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी 'रोड वॉशर सिस्टीम' असलेल्या वाहनांद्वारे रस्त्यांची साफसफाई करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले आहे. लक्ष्मीपूजन, नरक चतुर्दशीच्या दिवशी शहरातील सूक्ष्म धूलिकणांमध्ये दुप्पट वाढ झाली असून, हवेची गुणवत्ता अत्यंत खालावली आहे. हिवाळ्यात



जमिनीवरील धुलिकण हवेत जाऊन हवा प्रदूषित होते. त्यात फटाक्यांची भर पडली आहे. त्यामुळे शहरातील हवेची पातळी धोकादायक श्रेणीत गेली आहे. शहरातील वायू प्रदूषण रोखण्यासाठी पालिकेने ३२ प्रभागांमध्ये १६ वायू प्रदूषण नियंत्रण पथकांची नेमणूक करण्यात आली आहे. या पथकांद्वारे प्रभागातील बांधकामस्थळांना भेटी देऊन छायाचित्रे, चित्रफितीद्वारे त्याची नोंद घेण्यात येत आहे. प्रदूषण नियंत्रण तरतुदींचे पालन न केल्याचे उघड झाल्यास दंड आकारला जात आहे. प्रसंगी नोटीस बजावून कामाची जागा सील केली जात आहे. दैनंदिन वायू प्रदूषण निरीक्षण केले जाते. शहरातील ढाबा, बेकरी, रेस्टॉरंट आणि हॉटेल्स मालकांनी स्वयंपाकघरात पर्यावरणपूरक पर्यायांचा वापर करावा. तसेच डिझेल जनरेटरचा वापर करण्याचे शक्यतो टाळावे, असे आवाहन केले आहे. शहरातील हवेची गुणवत्ता वाढविण्यासाठी उद्योगांच्या वायू प्रदूषणावरही बारकाईने लक्ष ठेवले जाणार आहे. भारतीय उष्ण कटिबंधीय हवामानशास्त्र संस्थेच्या (आयआयटीएम) सफर संकेतस्थळाच्या माध्यमातून ही नोंद झाली आहे. अतिसूक्ष्म धूलिकण (पीएम २.५) आणि सूक्ष्म धूलिकणात (पीएम १०) वाढ झाल्याने शहराच्या काही भागातील हवेची गुणवत्ता चक्क खराब श्रेणीपर्यंत पोचली होती. संकेतस्थळाच्या नोंदीनुसार भोसरी, वाकडमधील भूमकर चौक, निगडी या भागातील हवेची गुणवत्ता सर्वात खराब श्रेणीत नोंदली गेली आहे. फटाक्यांसह अन्य बाबींमुळे ही परिस्थिती ओढवली असल्याचे उघड झाले आहे. हवा प्रदूषण रोखण्याच्या अनुषंगाने पालिकेच्या वतीने विविध उपाययोजना केल्या जात आहेत. त्याचाच भाग म्हणून शहरातील रस्त्यांची रोड वॉशर सिस्टीम असलेल्या दोन वाहनांद्वारे साफसफाई करण्यात येत आहे. मुख्य चौकांचे हवा प्रदूषण कमी करण्यासाठी मुव्हेबल फॉग कॅनन डस्ट सप्रेशन प्रणाली पाच नवीन वाहनांवर बसविण्यात आली आहे. त्याद्वारे प्रदूषण कमी करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहेत.

# पिंपरी-चिंचवडमधील प्रदूषण धोकादायक पातळीवर

## हिवाळ्यात जमिनीवरील धुलिकण हवेत जाऊन हवा प्रदूषित

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।** वाहनांचा धूर, बांधकामे, फटाक्यांमुळे शहरातील हवा अतिवाईट श्रेणीत गेली आहे. भोसरी, वाकडमधील भूमकर चौक, निगडी या भागातील हवेची गुणवत्ता सर्वांत खराब श्रेणीत नोंदली गेली आहे. त्यामुळे महापालिका प्रशासनाकडून विविध उपाययोजना हाती घेतल्या असून, शहरातील सर्व बांधकामे आठ दिवस बंद ठेवण्यात आले आहेत. शहरातील हवेच्या गुणवत्तेचा प्रश्न निर्माण झाला आहे. हिवाळ्यात जमिनीवरील धुलिकण हवेत जाऊन हवा प्रदूषित होते. त्यात फटाक्यांची भर पडत आहे. त्यामुळे शहरातील



हवा अतिवाईट श्रेणीत गेली आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील वायू प्रदूषण रोखण्यासाठी महापालिकेच्या वतीने ३२ प्रभागांमध्ये १६ वायू प्रदूषण नियंत्रण पथकांची नेमणूक करण्यात आली आहे. या पथकांद्वारे प्रभागातील बांधकाम स्थळांना भेटी देऊन छायाचित्रे, चित्रफितीद्वारे त्याची नोंद घेण्यात येत आहे. या दरम्यान प्रदूषण नियंत्रण तरतुदींचे पालन न केल्याचे उघड झाल्यास दंड आकारला जात आहे. दैनंदिन वायू प्रदूषण निरीक्षण केले जाते. शहरातील हवेची गुणवत्ता वाढविण्यासाठी उद्योगांच्या वायू प्रदूषणावरही बारकाईने लक्ष ठेवले जात आहे. भारतीय उष्णकटिबंधीय हवामानशास्त्र संस्थेच्या (आयआयटीएम) सफर या संकेतस्थळाच्या माध्यमातून प्रदूषणाच्या नोंद घेतल्या आहेत. अतिसूक्ष्म धूलिकण (पीएम २.५) आणि सूक्ष्म धूलिकणात (पीएम १०) वाढ झाल्याने शहराच्या काही भागातील हवेची गुणवत्ता खराब श्रेणीपर्यंत पोहोचली होती. सफर या संकेतस्थळाच्या नोंदीनुसार भोसरी,

> फटाक्यांसह आदी बाबींमुळे शहरातील काही भागाची हवेची पातळी खालावली आहे. हवेच्या गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी रस्त्यांची 'रोड वॉशर' यंत्रणा असलेल्या दोन वाहनांद्वारे साफसफाई करण्यात येत आहे. प्रदूषण कमी करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.
>
> – संजय कुलकर्णी, सह शहर अभियंता, पर्यावरण विभाग, पिंपरी-चिंचवड महापालिका

वाकडमधील भूमकर चौक, निगडी या भागातील हवेची गुणवत्ता सर्वांत खराब श्रेणीत नोंदली गेली आहे. वाढलेल्या प्रदूषणामुळे शहरातील हवेची गुणवत्ता ढासळल्याने पर्यावरण विभागाने शहरातील सर्व बांधकामे आठ दिवस बंद ठेवण्याचा प्रस्ताव तयार केला आहे. त्याला आयुक्त शेखर सिंह यांनी मान्यता दिली असून १९ नोव्हेंबर पर्यंत सर्व बांधकामे बंद राहणार आहेत. शहरातील हवेची गुणवत्ता ढासळून खराब श्रेणीत आल्याने प्रदूषणाची समस्या वाढली आहे. थंडीच्या काळात हवेचा वेग ही मंदावतो, परिणामी जमिनीलगतचे तापमान कमी असल्याने हवेतील प्रदूषणाचे धूलिकणदेखील जमिनीलगतच्या थरात राहतात. त्यामुळे प्रदूषणात वाढ होत हवेची गुणवत्ता खराब होते. हिवाळ्यात आधीच सर्दी खोकल्याचे आजार उद्भवतात, त्यात आता हवेची गुणवत्ता ढासळल्याने आरोग्याच्या समस्या देखील वाढू शकतात.

# पुणे महापालिकेतील समाविष्ट गावांतील रहिवाशांना दिलासा!

## मालमत्ता करात ४० टक्के सवलतीसाठी मुदत

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** महापालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या २३ गावांतील मिळकतींनाही कर आकारणी सुरू झाल्याने या गावातील निवासी मिळकतींना मिळकतकरातील ४० टक्क्यांची सवलत योजना लागू करण्यात आली आहे. त्यासाठी समाविष्ट गावातील मिळकतधारकांना सवलतीसाठी ३१ जानेवारीपर्यंत अर्ज करता येणार आहेत. दरम्यान, महापालिकेने यापूर्वीच शहराच्या जुन्या हद्दीसाठी या योजनेला ३० नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. समाविष्ट गावातील मिळकतींच्या नोंदी ठेवण्याची प्रक्रिया महापालिका प्रसासनाकडून सुरू करण्यात आली आहे. मांजरी, वाघोली, सूस-म्हाळुंगे, बावधन आदी भागात मोठ्या प्रमाणावर नागरीकरण झाले असून येथील मिळकतींची संख्याही अन्य गावांच्या तुलनेत जास्त आहे. त्यामुळे येथील मिळकतींच्या नोंदी ठेवण्याच्या कामाला विलंब होत असून ग्रामपंचायतीकडे असलेल्या नोंदीनुसार मिळकतींची महापालिकेच्या नियमानुसार कर निश्चिती केली जात आहे. त्यासाठी मिळकत शोधून त्याला नोटीस दिली जात असून सुनावणी घेण्यात येत आहे. समाविष्ट गावातील मिळकतींना टप्प्याटप्प्याने कर आकारणी केली जाणार असून त्यांनाही मिळकतकरातील ४० टक्क्यांची सवलत लागू करण्यात आली आहे. त्यासाठी येथील मिळकतधारकांना पीटी-३ अर्ज भरावा लागणार आहे. मात्र कर निश्चितीची प्रक्रिया सुरू असल्याने या योजनेचा लाभ घेण्यासाठी ३१ जानेवारीपर्यंतची मुदत देण्यात आली आहे. समाविष्ट गावात एकूण २ लाख ९३४ मिळकती असून, निवासी मिळकतींची संख्या १ लाख ८२ हजार १६४ एवढी असून, १४ हजार ३५१ व्यावसायिक मिळकती आहेत.




### विरोध करणारे वाढणार आहेत

» मिश्र वापराच्या ३ हजार ७१९ मिळकतींची नोंद महापालिका प्रशासनाकडे आहे. महापालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या २३ गावांतील मिळकतींनाही कर आकारणी सुरू झाल्याने या गावातील निवासी मिळकतींना मिळकतकरातील ४० टक्क्यांची सवलत योजना लागू करण्यात आली आहे. समाविष्ट गावातील मिळकतींच्या नोंदी ठेवण्याची प्रक्रिया महापालिका प्रसासनाकडून सुरू करण्यात आली आहे. मांजरी, वाघोली, सूस-म्हाळुंगे, बावधन आदी भागात मोठ्या प्रमाणावर नागरीकरण झाले असून येथील मिळकतींची संख्याही अन्य गावांच्या तुलनेत जास्त आहे. त्यामुळे येथील मिळकतींच्या नोंदी ठेवण्याच्या कामाला विलंब होत असून ग्रामपंचायतीकडे असलेल्या नोंदीनुसार मिळकतींची महापालिकेच्या नियमानुसार कर निश्चिती केली जात आहे. त्यासाठी मिळकत शोधून त्याला नोटीस दिली जात असून सुनावणी घेण्यात येत आहे.

# प्रदूषण रोखण्यासाठी नियमावलीचे पालन करणे बंधनकारक

## प्रदूषण रोखा अन्यथा काम बंद; महामेट्रोला दिला इशारा?

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** शहरातील वाढते प्रदूषण रोखण्यासाठी मेट्रो स्थानकाच्या कामाच्या ठिकाणी तसेच रेडिमिक्स प्लान्टभोवती पत्रे उभारणे आणि हिरवे आच्छादन टाकणे बंधनकारक असतानाही मेट्रो प्रशासनाकडून त्याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे. त्यामुळे प्रदूषण रोखण्यासाठी तातडीने उपाययोजना करा, अन्यथा काम बंद करावे लागेल, असा इशारा महापालिका आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांनी दिला आहे.

पुणे, मुंबईसह राज्यातील अनेक शहरांमधील प्रदूषणाची पातळी वाढली असून, नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर मुंबई उच्च न्यायालयानेही हवेच्या ढासळल्या गुणवत्तेबाबत चिंता व्यक्त करताना तातडीने उपाययोजना करण्याचे आदेश महापालिकांना दिले आहेत. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार महापालिका प्रशासनाकडूनही उपाययोजना हाती घेण्यात आल्या असून, त्याची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सूचनेनुसार मेट्रोचे काम करताना होणारे प्रदूषण रोखण्यासाठी नियमावलीचे पालन करणे बंधनकारक करण्यात आले आहे. मात्र महामेट्रोकडून त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. स्वारगेट येथील जेधे चौकात मेट्रो हब आणि बहुमजली इमारत उभारण्याचे काम सुरू आहे. या चौकात दिवसभर नागरिकांची मोठी गर्दी असते. तसेच वाहनांच्या वर्दळीमुळे प्रदूषण होत असते. मेट्रो हबच्या ठिकाणी बांधकामासाठीचा आरएमसी प्लांटही असून खडी, सिमेंट वाहून आणणाऱ्या वाहनांची संख्याही मोठी आहे. त्यामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात धूळ उडत आहे. पण या ठिकाणी काम करताना मेट्रोकडून नियमावलीकडे दुर्लक्ष केले जात आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सूचनेनुसार प्रदूषण रोखण्यासाठी पत्रे लावणे आणि हिरव्या रंगाचे अच्छादन टाकणे बंधनकारक आहे. मात्र त्याचे पालन होत नसल्याची तक्रार महापालिका आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांच्याकडे करण्यात आली होती. त्यामुळे येत्या दोन दिवसांच्या आता प्रदूषण रोखण्यासाठीच्या ठोस उपाययोजना करा अन्यथा काम बंद करावे लागेल, असा इशारा आयुक्तांनी महामेट्रोच्या अधिकाऱ्यांना दिला आहे.



### वाहनांच्या वर्दळीमुळे प्रदूषण

» महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सूचनेनुसार मेट्रोचे काम करताना होणारे प्रदूषण रोखण्यासाठी नियमावलीचे पालन करणे बंधनकारक करण्यात आले आहे. मात्र महामेट्रोकडून त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. स्वारगेट येथील जेधे चौकात मेट्रो हब आणि बहुमजली इमारत उभारण्याचे काम सुरू आहे. या चौकात दिवसभर नागरिकांची मोठी गर्दी असते. तसेच वाहनांच्या वर्दळीमुळे प्रदूषण होत असते. मेट्रो हबच्या ठिकाणी बांधकामासाठीचा आरएमसी प्लांटही असून खडी, सिमेंट वाहून आणणाऱ्या वाहनांची संख्याही मोठी आहे.

# पुण्यातील वाड्यांच्या पुनर्विकासाला गती


## महापालिकेने घेतला 'हा' महत्वपूर्ण निर्णय



पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी। सहा मीटर रुंदी असलेल्या आणि एक हजार चौरस मीटरपेक्षा कमी क्षेत्रफळ असलेल्या मिळकतींना हार्डशीप भरून साईड मार्जिनमध्ये सवलत देण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. त्यामुळे शहराच्या जुन्या हद्दीतील वाड्यांच्या पुनर्विकासाला गती मिळणार आहे. शहराच्या मध्यवर्ती भागात अनेक जुनी घरे आणि वाडे आहेत. महापालिकेची बांधकाम विकास नियंत्रण नियमावलीची अंमलबजावणी झाल्यानंतर नियमांमुळे वाड्यांच्या पुनर्विकासात अडथळे निर्माण झाले. वाड्यांचे कमी असलेले क्षेत्रफळ, भाडेकरूंची संख्या आणि एक मीटरच्या साईड मार्जिनच्या अटीमुळे पुनर्विकासाला खीळ बसली होती. त्यामुळे वाड्यांच्या पुनर्विकासाला चालना द्यावी, यासाठी सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींकडून सातत्याने पाठपुरावा सुरू होता. साईड मार्जिनच्या नियमावलीत शिथिलता आणावी, अशी मागणीही लोकप्रतिनिधींकडून करण्यात येत होती. त्यामुळे महापालिकेने राज्य शासनाच्या नगरविकास विभागाकडे पाठपुरावा सुरू केला होता. त्यानुसार हार्डशीप प्रिमियम आकारून तसेच जागेवरची स्थिती पाहून महापालिका आयुक्तांनी परवानगी देण्याबाबतचा निर्णय घ्यावा, अशी सूचना नगरविकास विभागाने महापालिकेला केली होती. त्यानुसार आयुक्तांनी १८ मीटर उंचीपर्यंतच्या इमारतींना हार्डशीप प्रिमियम आकारून बांधकाम परवानगी देण्याचे आदेश बांधकाम विभागाला दिले होते. मात्र त्यामध्ये सेवा रस्त्याची लांबी आणि रूंदी नमूद नसल्याने पुनर्विकास रखडला होता. या पार्श्वभूमीवर १८ मीटर उंचीच्या मिळकतींना हार्डशीप प्रिमियम आकारून साईड मार्जिनमध्ये सवलत देण्याचा निर्णय घेतला असून १८ मीटर पुढील उंचीच्या मिळकतींना दोन टक्के अतिरिक्त हार्डशीप प्रिमियम आकारला जाणार आहे. तसेच सहा मीटर रूंद रस्ता असेल तरच या सवलतीचा लाभ घेता येईल, असे आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांनी नमूद केले आहे. या निर्णयामुळे जुन्या वाड्यांच्या पुनर्विकासाला गती मिळणार असल्याची माहिती नगर अभियंता प्रशांत वाघमारे यांनी दिली.

# आढळराव पाटील अजित पवारांसोबत जाणार?

## शिरूरच्या राजकारणात जोरदार चर्चा





पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी। राज्यात लोकसभा निवडणुकी च्या पार्श्वभूमीवर सर्वच पक्षांनी आपल्या वाट्याच्या जागांसाठी दावा करण्यास सुरुवात केली आहे. राज्यात राष्ट्रवादीत फूट पडल्यानंतर शरद पवार गट आणि अजित पवार गट असे दोन गट निर्माण झाले आहेत. त्यामुळे प्रत्येक मतदार संघातील राजकीय समीकरणे बदलली आहेत. मात्र, सध्या सोशल मीडियावर शिरूर लोकसभेचे माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांची एक बातमी चांगलीच व्हायरल होत आहे. शिवाजीराव आढळराव पाटील हे लोकसभा निवडणुकीपूर्वी अजित पवार गटात प्रवेश करणार असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे शिरूरचे राजकारण बदलणार आहे. याबाबत एका वृत्तवाहिनीने देखील वृत्त प्रसारित केले आहे. आगामी होणाऱ्या निवडणुकांत अजित पवार गटाने लोकसभेच्या जागांसाठी राज्यभर चाचपणी सुरू केली आहे. त्यात शिरूर लोकसभेसाठी अजित पवार गटाने दावा केला असून त्यासाठी शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या नावाची चर्चा अजित पवार गटाकडून होऊ लागली आहे. त्यामुळे आढळराव पाटील अजित पवार गटात जाणार का ? अशी चर्चा आता सुरू झाली आहे. आढळराव पाटील यांनी उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला सोडचिठ्ठी देत शिंदे गटात सहभागी झाले. मात्र, शिंदे गटाकडून या जागेबाबत कोणतीही हालचाल होताना दिसत नाही. मात्र अजित पवार गटाने या जागेवर दावा केला असल्याची खात्रीलायक माहिती आहे. यासाठी शिवाजीराव आढळराव पाटील शिरूर लोकसभेसाठी इच्छुक आहे. पण ते जर अजित पवार गटात आले तर शरद पवार गटाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या विरोधात ते निवडणूक लढवावी लागणार आहे. मात्र या बातमी बाबत कोणतीही माहिती अद्याप समोर आलेली नाही.याबाबत शिवाजीराव आढळराव पाटील यांच्याशी संपर्क केला असता, आपण याबाबत अद्याप काहीही प्रतिक्रिया देणार नसल्याचे त्यांनी सांगितले आहे. मात्र व्हायरल होत असलेल्या बातमीने चांगल्याच चर्चा रंगल्या आहेत. सध्याचे सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांचे जवळचे सहकारी म्हणून शिवाजीराव आढळराव पाटील यांची ओळख होती. शिवाजीराव आढळराव पाटील यांनी सुरुवातीला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात कार्यरत होते. त्यानंतर राष्ट्रवादी सोडून त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. त्यानंतर त्यांनी सलग तीन वेळा शिरूर लोकसभेचे नेतृत्व केले. पश्चिम महाराष्ट्रातील शिवसेनेचे मातब्बर नेते म्हणून त्यांची ओळख आहे. मात्र, शिवसेनेत फूट पडल्यानंतर त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सोबत शिंदे गटात प्रवेश केला. त्यांनी त्यांच्या मतदार संघात जोरदार दौरे सुरू केले आहेत. ग्रामपंचायत निवडणुकीत देखील त्याचे परिणाम पहायला मिळाले. मात्र, आढळराव पाटील अजित पवार गटात जाणार असल्याच्या चर्चेने शिरूरच्या राजकारणात चर्चा सुरू झाल्या आहेत.